Maharashtra Times, 15/07/2026

# वाढवणजवळ आंतरराष्ट्रीय बाजार

## दापचरीमध्ये कृषी व्यापार केंद्र उभारण्याचा निर्णय

> “आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार हा प्रकल्प महाराष्ट्राला देशातील अग्रगण्य कृषी निर्यात केंद्र बनविण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरेल. हा केवळ बाजार नसून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेशी जोडणारा विकासाचा नवा मार्ग आहे.
>
> – जयकुमार रावल, पणनमंत्री

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

डहाणू तालुक्यातील दापचरी येथे ५५८.४३ हेक्टर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारण्याचा निर्णय मंगळवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. वाढवण बंदरापासून ४० किलोमीटरवर होऊ घातलेल्या बाजारामुळे महाराष्ट्रातील शेतकरी थेट जागतिक बाजारपेठेशी जोडले जातील, असा विश्वास राज्य सरकारने व्यक्त केला आहे.

‘देशांतर्गत; तसेच निर्यात बाजारपेठांच्या गरजा पूर्ण करणारे जागतिक दर्जाचे कृषी व्यापार केंद्र म्हणून या बाजाराची उभारणी केली जाईल,’ असे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. हा प्रकल्प फ्रान्समधील रुंगीस मार्केट, नेदरलँड्समधील रॉयल फ्लोरा हॉलंड; तसेच रॉटरडॅम बंदर परिसरातील आधुनिक कृषी लॉजिस्टिक व्यवस्थेच्या धर्तीवर विकसित करण्यात येणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. ‘राज्यात आंतरराष्ट्रीय बाजार, राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार आणि कृषी उत्पन्न बाजार समिती अशी त्रिस्तरीय विपणन व्यवस्था विकसित करण्याचे नियोजन आहे,’ अशी माहिती त्यांनी दिली.

### एकाच केंद्रात सहा सुविधा

दापचरी येथील केंद्रामध्ये घाऊक व्यापार, आयात-निर्यात सुविधा, शीतसाखळी व्यवस्था, श्रेणीकरण आणि पॅकेजिंग, मल्टिमॉडेल लॉजिस्टिक व्यवस्था; तसेच ॲग्रिटेक आणि एक्स्चेंज सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध केल्या जाणार आहेत. याशिवाय गोदामे, शीतगृह, फळ पिकवण्याचे केंद्र, गुणवत्ता परीक्षण सुविधा, कंटेनर टर्मिनल, रेल्वे सायडिंग, ई-लिलाव व्यवस्था आणि निर्यात सुलभता केंद्र उभारण्याचे नियोजन आहे.

Agrowon, 14/07/2026

# निर्यातीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात चांगली वाढ

## केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांचा दावा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) : एकीकडे 'एल निनो'चे गडद होत चाललेले सावट, त्यामुळे पिछाडीवर पडलेल्या पेरण्या आणि आयातीला प्रोत्साहन दिल्यामुळे मागील वर्षी प्रमुख पिकांना न मिळालेला भाव अशी विपरित परिस्थिती असताना दुसरीकडे भारतीय कृषी उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत चांगला भाव मिळत असल्याचा दावा केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्याही उत्पन्नात भर पडत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.**

### 'अमेरिकेसोबतच्या व्यापार कराराच्या चर्चेला वेग'

भारत आणि अमेरिका यांच्यात प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार करारासाठी दोन्ही देशांचे अधिकारी सक्रियपणे चर्चा करत असून, त्याचा उद्योग, शेतकरी, कामगार आणि ग्राहक या सर्व घटकांना ठोस लाभ मिळेल असा संतुलित व व्यावसायिकदृष्ट्या अर्थपूर्ण करार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे, अशी माहिती गोयल यांनी दिली. गेल्या महिन्यात आपण अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीअर यांची नवी दिल्लीत भेट घेतली होती. या बैठकीत दोन्ही देशांनी संतुलित, व्यावसायिकदृष्ट्या परिणामकारक आणि उद्योग, शेतकरी, कामगार तसेच ग्राहकांना प्रत्यक्ष लाभ देणाऱ्या व्यापार करारासाठी वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली, असे त्यांनी नमूद केले. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दोन्ही देशांची पथके सातत्याने काम करत आहेत, असे गोयल म्हणाले.



भारतीय कृषी आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांची निर्यात जागतिक बाजारपेठेत सातत्याने वाढत असून, देशातील विविध राज्यांतील उत्पादनांना नव्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठा मिळत आहेत, असे गोयल यांनी सोमवारी (ता. १३) सांगितले. समाजमाध्यमांवर प्रकाशित केलेल्या पोस्टमध्ये गोयल यांनी भारतीय फळे, भरडधान्यांची (मिलेट) उत्पादने आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांच्या निर्यातीचा आढावा घेतला. भारतीय उत्पादनांनी जगभरातील ग्राहकांची मने जिंकली आहेत, असे त्यांनी या पोस्टमध्ये म्हंटले आहे.

गोयल यांच्या म्हणण्यानुसार, झारखंडमधील महिला शेतकरी उत्पादक कंपनीने पिकविलेल्या आम्रपाली आंब्यांची प्रथमच ब्रिटन आणि दुबई येथे निर्यात झाली. **पान ४ वर »**

Agrowon, 14/07/2026

# निर्यातीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ

» पान १ वरून

यामुळे महिला शेतकऱ्यांना सुमारे १८० टक्के अधिक उत्पन्न मिळाले. कर्नाटकमधील वनस्पतीजन्य घटकांनी समृद्ध मिलेट-आधारित फंक्शनल फूड्स न्यूझीलंडला निर्यात करण्यात आले. जम्मू-काश्मीरमधील 'अरेको चेरी' आणि 'सेंट्रोस प्लम' अबुधाबी व दुबई येथे पोहोचले असून, उत्पादकांना १२० टक्क्यांपर्यंत अधिक दर मिळाला आहे.

उत्तराखंडमधील हिमालयीन लिची प्रथमच इटलीला निर्यात झाली. पंजाबमधील ताज्या लिचीची ओमानमध्ये, तर आसामच्या भौगोलिक मानांकनप्राप्त (जीआय) तेजपूर लिचीची दुबईमध्ये निर्यात झाली. या उत्पादनांना प्रीमियम दर मिळाल्याचा दावा गोयल यांनी केला.

मध्य प्रदेशातील 'जीआय' मानांकनप्राप्त रेवा सुंदरजा आंबा संयुक्त अरब अमिरातीत निर्यात झाला. स्थानिक बाजारपेठेपेक्षा शेतकऱ्यांना ४० ते ५० टक्के अधिक दर मिळाला. आंध्र प्रदेशातील बैंगनपल्ली आंब्यांची प्रथमच समुद्रमार्गे सिंगापूरला निर्यात करण्यात आली. ओडिशातील २२.६ टन सुकविलेली अंडी पावडर ऑस्ट्रियाला निर्यात करण्यात आली असून, तिने युरोपमधील कठोर गुणवत्ता निकष पूर्ण केले, असे गोयल यांनी या पोस्टमध्ये म्हंटले आहे.

प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांमध्ये उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील बिस्किटांची भारत-ओमान मुक्त व्यापार कराराअंतर्गत ओमानला निर्यात झाली असून, या क्षेत्रासाठीही नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत.

गोयल म्हणाले की, या प्रत्येक निर्यातीतून शेतकऱ्यांना अधिक चांगला भाव मिळाला, तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (एमएसएमई) संधी मिळाली. रोजगारनिर्मिती आणि भारतीय उत्पादनांबद्दल जागतिक विश्वास अधिक मजबूत होत आहे.

Agrowon, 12/07/2026

# कृषी उत्पादनांच्या बळावर बुलडाण्याची निर्यातीत मोठी झेप

## १०५१ कोटींचा टप्पा पार; अमरावती विभागात सलग अव्वल

अॅग्रोवन वृत्तसेवा

बुलडाणा : कृषी उत्पादन, प्रक्रिया उद्योग आणि मूल्यवर्धित उत्पादनांच्या वाढत्या निर्यातीमुळे बुलडाणा जिल्ह्याने निर्यात क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी नोंदविली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्ह्याची निर्यात प्रथमच १०५१ कोटी रुपयांवर पोहोचली असून, अमरावती विभागात बुलडाण्याने सलग अव्वल स्थान कायम राखले आहे. विभागाच्या एकूण २२१८ कोटी रुपयांच्या निर्यातीत बुलडाण्याचा तब्बल ४७.४ टक्के वाटा आहे.

शेतीप्रधान जिल्हा म्हणून ओळख असलेल्या बुलडाण्यातील शेतीमालाला जागतिक बाजारपेठ मिळत असून, कापूस, गळीतधान्ये, कृषी बियाणे, भाज्या आणि कंदमुळे यांच्या निर्यातीला मोठी चालना मिळाली आहे. गेल्या पाच वर्षांत जिल्ह्याच्या निर्यातीत तब्बल १४६ टक्क्यांची वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ४२८ कोटी रुपये असलेली निर्यात आता १०५१ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

निर्यातीत २२३ कोटी रुपयांसह कापूस आघाडीवर असून, गळीत धान्ये व कृषी बियाण्यांची १३८ कोटी रुपये, तर खाद्य भाज्या व कंदमुळांची ११६ कोटी रुपयांची निर्यात झाली आहे. याशिवाय कृषी उत्पादनांवर आधारित प्रक्रिया उद्योगांनाही मोठी गती मिळाली आहे. सुगंधी तेले, सौंदर्यप्रसाधने तसेच विविध रासायनिक उत्पादनांच्या निर्यातीमुळे जिल्ह्याच्या एकूण निर्यात मूल्यात मोठी भर पडली आहे.

बुलडाण्यातील शेतीमाल आणि प्रक्रिया केलेल्या उत्पादनांना बांगलादेशसह युनायटेड किंगडम, नेदरलँड्स, सिंगापूर आणि अमेरिका या देशांमध्ये वाढती मागणी मिळत आहे. त्यामुळे स्थानिक शेतकरी, कृषी उद्योजक आणि निर्यातदारांसाठी नव्या संधी निर्माण होत आहेत. कृषी क्षेत्रातील उत्पादन क्षमता वाढविणे, शेतीमालाचे मूल्यवर्धन करणे आणि जागतिक बाजारपेठेशी जोडणी मजबूत करणे यावर प्रशासनाकडून भर दिला जात आहे. 'डिस्ट्रिक्ट्स एक्स्पोर्ट हब' उपक्रमांतर्गत खरेदीदार-विक्रेता मेळावे, निर्यात नोंदणी, गुणवत्ता मानकांबाबत मार्गदर्शन तसेच प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. भविष्यात शीतगृह सुविधा, कृषी प्रक्रिया उद्योग आणि विशेष क्लस्टरच्या माध्यमातून निर्यातीला आणखी चालना देण्याचे नियोजन आहे.

> “
> जिल्ह्याने निर्यातीत घेतलेली झेप निश्चितच समाधानकारक आहे. एक हजार कोटी रुपयांच्या निर्यातीचा टप्पा पार करणे हा संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. ही कामगिरी साध्य करण्यासाठी संबंधित सर्वांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे.
> - **डॉ. प्रवीणकुमार देवरे,**
> जिल्हाधिकारी, बुलडाणा

### जिल्हानिहाय निर्यात

| | |
|---|---|
| बुलडाणा | १,०५१ कोटी |
| अकोला | ५१९ कोटी |
| अमरावती | ३५० कोटी |
| यवतमाळ | २५७ कोटी |
| वाशीम | ४१ कोटी |